दिनांक २९ डिसेंबर २०१८

**कृपया प्रसिद्धीसाठी**

## पार्ले महोत्सवाची वरिष्ठ नागरिकांनाही भुरळ; सहभागाने उत्तररंगही रंगला आनंद अन् उत्साहात

19 व्या पार्ले महोत्सव-सी.एम. चषकाची भुरळ वरिष्ठ नागरिकांनाही पडली असून त्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. स्पर्धेच्या उत्साहाने त्यांच्या आयुष्याच्या उत्तररंगदेखील आनंदाने द्विगुणित झाला. विशेष म्हणजे या महोत्सवात लग्नाची 50 वर्षे पूर्ण केलेली अनेक दांपत्यंदेखील होती. त्यांचा हृद्य सत्कार महोत्सवाचे मुख्य आयोजक व भाजपा आमदार पराग अळवणी आणि नगरसेविका ज्योती अळवणी यांनी केला. तसेच सर्व स्पर्धकांनाही सन्मानित केले गेले. त्यामुळे स्पर्धेबरोबर एक भावपूर्ण सोहळाच त्यांना अनुभवण्यात मिळाला.

### दिव्यांगांच्याही कलागुणांचे प्रदर्शन

महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातून आलेल्या स्पर्धकांमध्ये दिव्यांगांनीही आपल्या कलागुणांचे प्रदर्शन घडविले. चित्रकला तसेच रांगोळी स्पर्धांमध्ये त्यांचा सहभाग होता. अक्षय वैद्य, श्रेयस कानजी, चैत्राली देढिया यांनी अनुक्रमे पहिले तीन क्रमांक  चित्रकला स्पर्धेत पटकावले. श्रेयस कानजी हा गेली 3 वर्षे या महोत्सवात सहभागी होत असून दरवेळी त्याने उत्तम कामगिरी केल्यामुळे सन्मान प्राप्त केला आहे. यंदाही या सर्व स्पर्धकांना महोत्सवाचे मुख्य आयोजक व भाजपा आमदार पराग अळवणी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

विविध गटांमध्ये होत असलेल्या अन्य स्पर्धांच्याही उपांत्य व अंतिम फेरीचे सामने आता रंगू लागले आहेत. त्यामुळे एकच उत्कंठता यानिमित्ताने दिसून येत आहे. स्पर्धकांचा उत्साह वाढविण्यासाठी खासदार व भारतीय जनता युवा मोर्चाच्या राष्ट्रीय अध्यक्षा पूनम महाजन यांनी महोत्सवाला भेट दिली तसेच प्रगती करतोय महाराष्ट्र माझा या केंद्र व राज्य सरकारच्या योजनांची माहिती देणा-या प्रदर्शनाचीदेखील पाहणी केली. यावेळी बोलताना त्यांनी हा महोत्सव लिमका बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद घेतला जावा, असा आहे. हा महोत्सव जनतेशी जुळवून त्यांच्याकडून पुढे नेला जात आहे, पार्लेकर हा महोत्सव 19 वर्षे साजरे करत आहेत, यंदा सी. एम. चषकाचीही जोड त्याला मिळाली असून पार्ले महोत्सवातून लोकांपर्यंत पोहचण्याचे हे प्रभावी माध्यम आहे, असे सांगितले.

सी.एम. चषकला पार्लेकरांनी उत्सफूर्त प्रतिसाद दिल्याची माहिती मुख्य आयोजक व भाजपा आमदार ॲड. पराग अळवणी यांनी दिली. इथे प्रत्येकाला आपापली जबाबदारी माहिती असून प्रत्येकजण यात आपला सहभाग स्वतःहून देत आहे, त्यामुळे हा आता समस्त पार्लेकरांचा महोत्सव झाला आहे, असेही ते म्हणाले.

**मेन्स फिजिक फिटनेस स्पर्धेचे निकाल**

दरम्यान क्रीडा प्रकारातील मेन्स फिजिक फिटनेस स्पर्धेत 170 सेमी गटात मंगेश गावडे यांनी बाजी मारली असून उपविजेते विजय हाप्पे, यज्ञेश भूरे, भागेश गोपाल, कौस्तुभ पाटील यांनी पटकाविले. 170 सेमी वरील फिटनेस गटात सुरज बणा यांनी विजेतेपट मिळविले. या गटात सुरज पुजारी, स्वराज सिंग, संजय मकबान, रोहन हडकर यांनी उपविजेतेपट पटकाविले. मुंबई महाननगरपालिका उपायुक्त आनंद वघ्राळकर, महापालिका कार्यकारी अभियंते अविनाश इंजिनिअर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. अशा स्पर्धांमध्ये मुंबई श्रीचा पुरस्कार मिळविलेला रोहन कदम देखील यावेळी उपस्थित होते. या स्पर्धेला एक चांगले व्यासपीठ उपलब्ध करून दिले, याबद्दल त्यांनी आयोजकांचे आभार मानले. मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना सन्मानित करण्यात आले.